एस.सी.सी. ३६१/२०२४
सरकार वि. राजेंद्र नवले
निशाणी १२ सोबत

**अभियोगपक्षातर्फे सा.क्र. २ याची जबानी**
**मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – सुनिल संपत नागरे, वय – ३५ वर्षे,
व्यवसाय – पोलीस कॉन्स्टेबल, राहणार – अकोले,
तालुका – अकोले, जिल्हा – अहमदनगर.

**सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत –**

१. दिनांक ११.०७.२०२४ रोजी मी पोलीस स्टेशन अकोले येथे पोलीस कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत होतो. त्यादिवशी सायंकाळी ०७:०० वाजता पोलीस स्टेशनला हजर असताना मला व पोलीस नाईक वलवे, पोलीस कॉन्स्टेबल गोरे अशांना पोलीस निरिक्षक पाटील साहेब यांनी त्यांच्या कॅबीनमध्ये बोलावून कळवले की, त्यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, इंदोरी गावच्या शिवारात हॉटेल ताजच्या आडोशाला एक इसम दारू विक्री करत आहे तरी सदर ठिकाणी जावून कारवाई करा.

२. त्यानंतर पोलीस नाईक वलवे यांनी दोन पंचांना बोलावून त्यांना बातमीतील हकिगत सांगून ते तयार झाल्याने आम्ही सरकारी वाहनाने बातमीतील नमूद ठिकाणी गेलो. तेथे आम्हाला व पंचांना खात्री होताच ०७:३० वाजता छापा टाकला. एक इसम हातात पिशवी घेवून उभा होता. त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव राजेंद्र भागवत नवले, वय ४० वर्ष, रा. इंदोरी असे सांगितले. त्याच्याकडे असलेल्या पिशवीची झडती घेतली असता त्यामध्ये रक्कम रूपये ७०/– प्रत्येकी किंमतीच्या ६ सिलबंद देशी बॉबी संत्रा कंपनीच्या बाटल्या मिळून आल्या. सदरचा मुद्देमाल मिळून आल्याने पोलीस नाईक वलवे यांनी जागीच पंचनामा

करून एक बाटली रासायनिक विश्लेषणाकरीता वेगळी काढून सदरचा मुद्देमाल जप्त केला. त्यानंतर पोलीस स्टेशनला येवून सदर घटनेबाबत मी फिर्याद दिली.

३. आता मला अभिलेखावरील सदरची फिर्याद व छापील प्रथम खबर अहवाल दाखवण्यात आला. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यास अनुक्रमे **निशाणी १८ व १९** देण्यात येते. जप्त मुद्देमाल पाहिल्यास मी ओळखू शकतो. मी आरोपीस ओळखतो. तो आजरोजी न्यायालयात हजर नाही.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री.वाय. एन. पांडे यांच्या मार्फत</u>**

४. हे म्हणणे खरे आहे की, वरिष्ठांनी आम्हाला छापा टाकण्यासाठी लेखी आदेश दिला नव्हता. आम्ही छापा टाकण्यासाठी जातेवेळी सरकारी वाहनाची जाण्याची व येण्याची वेळेची नोंद केली होती. आरोपीच्या हातात कोणत्या रंगाची पिशवी होती हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरची पिशवी माझेसमक्ष जप्त केलेली नाही. सदर घटनेबाबत फिर्याद मी ०८:०० वाजण्याच्या सुमारास दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, फिर्याद देतेवेळी मी प्रत्यक्ष हजर नव्हतो.

५. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या वरिष्ठांना त्यांचा केसेसचा कोटा पुर्ण करायचा होता त्यामुळे त्यांनी मला सदरची फिर्याद देण्यास सांगितले. ताज हॉटेल हे आरोपीच्या मालकीचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही आरोपीच्या ताब्यातुन कोणताही मुद्देमाल जप्त केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, जप्त मुद्देमालाचा बॅच नंबर मी फिर्यादीत नमूद केलेला

नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीविरूध्द खोटी फिर्याद दाखल केली.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2026.02.06 17:24:18 +0530

दिनांक ०६.०२.२०२६
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले.